(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधी यांचे महिला सबलीकरण विषयक विचाराबाबत सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांच्या मतांचे अध्ययन

**प्रा.डॉ. लक्ष्मी सी.डाखोळे ,** सहाय्यक प्राध्यापक, बी पी एन आय एस डब्ल्यू नागपूर.

---

**सारांश( Abstract) :**

प्रस्तुत अध्ययनामध्ये 20 सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिक महिलांची दक्षिण नागपूर येथील सोयीस्कर नमुना निवड पद्धतीचा वापर करून निवड करण्यात आली. अध्ययनातील सेवानिवृत्त ज्येष्ठ स्त्रिया कुटुंबामध्ये राहणाऱ्या आहे. सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांच्या कुटुंबीयांना महात्मा गांधीजींचे महिला सबलीकरण विषयक विचार माहिती असूनही कुटुंबामध्ये स्त्रियांना प्रत्येक बाबतीत समान महत्त्व दिले जात नाही. सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांनी सेवानिवृत्तीनंतरचे नियोजन निवृत्ती पूर्वी केले नाही. निवृत्तीनंतर उत्तरदात्यांना आर्थिक स्वातंत्र्य नाही. महात्मा गांधीजींनी स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला परंतु ज्येष्ठ नागरिक महिलांना कुटुंबामध्ये समान दर्जा दिला जात नाही. महात्मा गांधीजींनी स्त्री-पुरुषांना समान हक्क प्राप्त व्हावे यासाठी कार्य केले. परंतु सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांना कुटुंबामध्ये समान हक्क दिले जात नाही. गांधीजींनी स्त्रियांवरील घरात व घराबाहेर होणाऱ्या अन्यायाचा विचार करताना प्रत्येक स्त्रीला कुटुंबामध्ये व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असा आग्रह धरला. सेवानिवृत्त ज्येष्ठ स्त्रियांना कुटुंबामध्ये शाब्दिक अवमान, अपमान सहन करावा लागतो. स्त्रियांनी प्रत्येक गोष्टीमध्ये स्वतःला सक्षम करणे गरजेचे आहे. स्त्रियांनी स्वतःला कमी लेखू नये असा गांधीजींचा आग्रह होता. सेवानिवृत्त स्त्रियांना निवृत्तीनंतर स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचे स्वातंत्र्य नाही. स्त्री पुरुष समता अंमलात आणताना स्त्री-पुरुषांमधील विशिष्टता न नाकारता न झाकता,घरांची खाजगी बंदिस्त आणि सार्वजनिक जीवनावरील स्त्रियांवर असणारे अघोषित संचारबंदी मोडण्याच्या संबंधी विचारकृतीचे दर्शन गांधी तत्त्वज्ञान आणि महिला सबलीकरण मध्ये दिसते.

***सुचक शब्द ( Key Words) :***

महिला सबलीकरण, सेवानिवृत्त, ज्येष्ठ महिला,दुर्लक्षित.

***अध्ययनाचे उद्देश (Objective of The study):***

१) सेवानिवृत्त ज्येष्ठ स्त्रियांचे कौटुंबिक समानतेबाबत मत जाणून घेणे.

२) सेवानिवृत्त ज्येष्ठ स्त्रियांचे कुटुंबामधील आर्थिक समानतेबाबत मत जाणून घेणे.

***प्रस्तावना (Introduction) :***

स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रीला बलवान करणे. त्यासाठी तिची सत्ता संपादन करणे वा सत्ता वाढवणे आवश्यक ठरते.( Empower means to give or to acquire or to increase power) सबलीकरणात सत्तेचे सूत्र बदलणे किंवा स्तर बदलणे गृहीत असते.सत्ता( Power )म्हणजे नियंत्रण सत्तेचा संबंध व्यक्ती गट वा समूहाशी येतो. स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रियांचा सत्ता विभागणीत समान वाटा, निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान आणि सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक जीवनात त्याबाबतची समानता प्राप्त होणे होय.

महात्मा गांधीजींना अहिंसक समाजरचना अभिप्रेत होती. त्यासाठी समाजातील महिलांचे सबलीकरण होणे गरजेचे आहे. गांधीजी केवळ कुटुंबातच नाही तर समाजात आणि राष्ट्रीय लढयातही स्त्रीला महत्त्वाची भूमिका देत. गांधीजींनी कुटुंबाला महत्त्वाचे स्थान देताना स्त्रीलाही महत्त्व दिले आहे. कौटुंबिक पातळीवर कामाची विभागणी व्हावी, पतीनेही घराची जबाबदारी स्वीकारावी असे गांधीजी म्हणत. गांधीजी स्वतः आश्रमात भाजी चिरणे, स्वयंपाक, साफसफाई ही कामे जातीने स्वतः करत आणि त्यांच्या अनुयायांनाही करायला सांगत. काम हे लिंगभावाशी संबंधित नाही कोणत्याही कामात कमीपणा नाही असे गांधीजी म्हणत. 'ड्युटीफूल इज ब्युटीफूल'अशी सुंदरतेची नवी व्याख्या गांधीजींनी केली. कौटुंबिक कामातच स्त्रीने अडकून पडू नये म्हणून गांधीजी पुरुषालाही त्यांच्यां कर्तव्याची जाणीव करून देत. स्त्रीला तिचा स्वतःचा विकास आणि जीवन निश्चित करण्याचा अधिकार आहे असे गांधीजी म्हणत.

' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' याचा अर्थ ज्या ठिकाणी स्त्रीची पूजा होते सन्मान होतो तेथे देवता निवास करतात.भारताला स्वातंत्र्य मिळून अर्धशतक जास्त झालेआहे. २६ जानेवारी १९५०मध्ये भारताला संविधान लागू करण्यात आले परंतु आजही एकविसाव्या शतकात स्त्रियांना पुरुषप्रधान समाजाने दुय्यम दर्जा दिलेला आहे. महिलांचे सबलीकरण म्हणजे महिलांचे अधिकार हक्क आणि कृती याबाबत निर्णय घेऊन त्यावर नियंत्रण ठेवून त्याचा उपयोग करून घेऊन समाजामध्ये प्रतिष्ठा युक्त जीवन जगणे होय. भारत सरकारने २००१ हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून जाहीर केले आहे. महिला सबलीकरणात महात्मा गांधींचे फार मोठे योगदान आहे. गांधीजींनी स्त्रीला आत्मत्याग, प्रेम श्रद्धा व ज्ञानाची मूर्ती मानले. स्त्री पुरुष दर्जाबाबत गांधीजी म्हणतात,दोघेही एक दुसऱ्याशिवाय आपले अस्तित्व सिद्ध करू शकत नाही.दोघांमध्ये समान मानसिक क्षमता आहे.

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत ज्येष्ठांना आधाराचे स्थान आहे. भारतीय ग्रंथातून चतुर्विध आश्रमाचा सिद्धांत मांडलेला आहे. जगामध्ये एक दशलक्ष लोक प्रत्येक महिन्याला वयाची साठी ओलांडतात. त्यापैकी जवळपास ८०टक्के लोक हे विकसनशील राष्ट्रातील असतात. भारतातही ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. देशात वीस वर्षापेक्षा कमी वयाची जवळपास ५०% लोकसंख्या आहे. यापुढे ज्येष्ठांची संख्या वाढलेली असेल. कारण मृत्यूदार व जननदर यामध्ये मोठ्या प्रमाणात घट होत असल्यामुळे जन्माच्या वेळी व जन्मानंतर पुढे ही अपेक्षित आयुर्मान वाढलेले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा लोकांचे आयुर्मान ३२ वर्षे होते. आज ते साठ वर्षापर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे.ज्येष्ठ नागरिक स्त्रियांना दुर्लक्षित घटक म्हणून पाहिले जाते. त्यामुळे सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिक स्त्रियांना समस्यांना सामोरे जावे लागते. ज्येष्ठ हा सुजाण असल्याने सरकारला या मोठ्या लोकसंख्या असलेल्या घटकाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. वृद्धत्व ही समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि जीवशास्त्रीय प्रक्रिया आहे.

२००१च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात जेष्ठ नागरिकांची( ६०+) संख्या ८४.५लाख होती. त्यापैकी ३९.५ लाख पुरुष आणि ४५ लाख स्त्रिया होत्या. २००१ मध्ये ज्येष्ठांची संख्या वाढून एक कोटीच्या पुढे गेली आहे.यापैकी ४६.५ लाख पुरुष आणि ५३.५ लाख स्त्री आहेत.२०११ मध्ये भारतातील ज्येष्ठांची संख्या दहा कोटी वर पोहोचली आहे. आरोग्य सेवांची उपलब्धता व सुधारित पोषण यामुळे मृत्युदर कमी कमी होत आहे आयुर्मर्यादा वाढत आहे आणि त्याचाच परिणाम म्हणून जेष्ठ नागरिकांची संख्या सर्वत्र वाढत आहे.

भारतात एकूण लोकसंख्येच्या ७.५०% व्यक्ती साठ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या होत्या. त्यात पुरुष व स्त्रियांचे प्रमाण अनुक्रमे ७.१०व ८.०० टक्के इतके होते. २०१६ पर्यंत हे ज्येष्ठांचे प्रमाण ९.३०% तर २०२६ पर्यंत १२.४०% झालेले असेल.

भारतीय स्त्री हे खऱ्या अर्थाने गांधी युगातच मुक्त झाली असे म्हटल्यास वाग्य ठरणार नाही. स्त्री ही समाजाची अर्धी शक्ती आहे. म्हणून या शक्तीला श्रेष्ठत्व मिळाले तर नवसमाज निर्माण होऊ शकतो. सामाजिक, आर्थिक,राजकीय क्षेत्रापासून वंचित न ठेवता पुरुषाबरोबरच समान हक्क व प्रतिष्ठा प्राप्त झाली तरच महात्मा गांधीजींचे स्वप्न साकार होईल. ज्या स्वराज्यात स्त्रियांनापुरुषांच्या बरोबरीने स्थान नाही ते स्वराज्यच नाही असे गांधीजींचे मत होते.

*अध्ययन क्षेत्र (Area of Study ):*

नागपूर शहरातील दक्षिण नागपूर येथील शाहू नगर ह्या क्षेत्राची अध्ययनासाठी निवड करण्यात आली.

***नमुना निवड व तथ्य संकलन (Sampling & Data Collection) :***

प्रस्तुत अध्ययनासाठी २० सेवानिवृत्त ज्येष्ठ स्त्रियांची निवड करण्यात आली. तथ्य संकलनासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड मधील सोयीस्कर नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला. प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीमधील मुलाखत अनुसूचीचा वापर करून तथ्य संकलित करण्यात आले. प्रस्तुत अध्ययनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीमधील इंटरनेट, लेख यांचा उपयोग करण्यात आला.

***तथ्य विश्लेषण आणि निर्वचन ( Data Interpretation & Analysis) :***

प्रस्तुत अध्ययनामध्ये मुलाखत अनुसूची या पद्धतीचा वापर करतांना उत्तरदात्यांसोबत झालेल्या चर्चेदरम्यान मिळालेली माहिती पुढील प्रमाणे-

सेवानिवृत्त ज्येष्ठ स्त्रिया कुटुंबामध्ये राहतात. कुटुंबामध्ये सेवानिवृत्तीनंतर महिलांची जबाबदारी कमी झालेली नाही. सेवानिवृत्तीनंतर नवीन जबाबदाऱ्या त्यांच्या समोर आल्या. ज्येष्ठ महिलांनी संपूर्ण आयुष्य कुटुंबासाठी कष्ट केले. कुटुंबातील सदस्यांना सर्व सुख सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी नोकरी स्वीकारली. घर आणि नोकरी मुलांचा सांभाळ,सणवार, नातेवाईक हे सर्व व्यवस्थित करीत होत्या.अगदी तारेवरची कसरत करून सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांनी कुटुंबाचा व्यवस्थित सांभाळ व काळजी घेतली. स्वतः त्रास सोसून मुलांना सुखकर आयुष्य दिले.

सेवानिवृत्तीनंतर ज्येष्ठ महिलांचा जास्तीत जास्त वेळ घरामध्ये जातो त्यामुळे सून मुलगा यांच्या वागणुकीमध्ये बदल झाला. सेवानिवृत्तीनंतर अर्धे उत्पन्न पेन्शन मिळत असल्यामुळे ज्येष्ठ स्त्रियांना स्वतःच्या खर्चांना मुरड घालावी लागली. नातेवाईकांसाठी वस्तू खरेदी करणे,स्वतःसाठी वस्तू घेणे कमी झाले. निवृत्तीनंतर कुटुंबामध्ये मिळणारा मान सन्मान कमी झाला. सेवानिवृत्तीनंतरच्या अपुरे उत्पन्न, वाढलेला खर्च यामुळे कुटुंबातील सदस्यांची चिडचिड होत असे. कुटुंबातील निर्णय प्रक्रियेमध्ये मुलगा सून हे ज्येष्ठ स्त्रियांचे मत विचारात घेत नाही. स्वतः घेतलेला निर्णयही सांगत नाही. कुटुंबातील काम करण्यास मात्र सांगतात. ज्येष्ठ स्त्रियांचा कुटुंबातील सदस्यांना निवृत्तीनंतरचा सहभाग, हस्तक्षेप किंवा लुडबुड वाटू लागला.मुलगा घालून पाडून बोलतो. एक व्यक्ती म्हणून कुटुंबाद्वारे सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांना जे मानवी हक्क मिळणे गरजेचे आहे ते मिळत नाही. गृहलक्ष्मीच नव्हे तर अनेक भूमिका ज्येष्ठ नागरिक स्त्रियांनी पार पाडल्या.

स्त्री-पुरुषांमधील भिन्नतेची मुळे शारीरिकतेमध्ये असतात. समाजामध्ये वावरण्याची दोघांची भिन्न क्षेत्रे असतात. भिन्न भूमिका असतात. परंतु ते एकमेकांना पूरक असतात. स्त्रिया निर्मितीक्षम असतात.घराघरात आई बायको या नात्यातून त्यांची निर्मितीक्षमता अभिव्यक्त होते.स्त्रियांमध्ये स्वावलंबन, धैर्य, संयम, शुद्धता आणि दुःख सहन करण्याची अमाप शक्ती असते. म्हणून स्त्रियांचा गुणात्मक दर्जा पुरुषांपेक्षा उच्च असतो. महात्मा गांधींजींनी स्त्रियांकडे सुधारणेस योग्य म्हणून न पाहता आत्मभाव असलेले माणूस म्हणून पाहिले. स्त्रियांवरील घरात, घराबाहेर होणारा अत्याचार व अन्यायाचा विचार करतांना गांधीजींनी प्रत्येक स्त्रीला कुटुंबामध्ये व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा आणि स्वायत्तता मिळाली पाहिजे या विचाराचा पुरस्कार केला.

स्त्री पुरुष समता अंमलात आणतांना स्त्री-पुरुषांमधील विशिष्टता न नाकारता, न झाकता घरांची खाजगी बंदिस्त आणि सार्वजनिक जीवनावरील स्त्रियांवर असणारे अघोषित संचारबंदी जोडण्याच्या संबंधी विचारकृतीचे दर्शन गांधी तत्त्वज्ञान आणि महिला सबलीकरणांमध्ये दिसते. आधुनिकीकरणामुळे सामाजिक गतिमानतेत वाढ होत असली तरी वैयक्तिक पातळीवर व्यक्ती परस्परांपासून दूर जात आहे. एकमेकांबद्दल जे प्रेम होते ते सेवानिवृत्तीनंतर कमी झाले. सेवानिवृत्तीनंतर ज्येष्ठ नागरिकांकडून कुटुंबियांच्या अपेक्षा वाढलेल्या आहे. कुटुंबातील सदस्यांमधील भावनिक ओलावा कमी झालेला आहे. आज स्वार्थी वृत्ती वाढलेली आहे. कुटुंबातील सदस्य स्वतःचा विचार करतात. ज्येष्ठ नागरिक स्त्रियांचा विचार करत नाही. महात्मा गांधीजींच्या महिला सबलीकरण विचारानुसार कुटुंबियांनी समाजाने वागणे गरजेचे आहे तरच गांधीजींचे स्त्री पुरुष समानता चे स्वप्न साकार होईल.

स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा आहे. म्हणून पुरुषाच्या बरोबरीने आपले कर्तव्य पार पाडण्यास स्त्रिया समर्थ आहेत. गांधीजींनी स्त्रियांना स्वातंत्र्य व स्वाधीनतेचा अधिकार दाखवून दिला. गांधीजी म्हणत,पत्नी ही दासी नाही तर प्रत्येक बाबतीत समान हक्क असलेली सखी व सहचारी आहे. स्त्रीच्या अंगी त्याग, कष्ट, सहनशीलता हे गुण आहेत त्यामुळे स्त्री केवळ कुटुंबालाच नव्हे तर समाजाला व राष्ट्राला अनेक मार्गाने मदत करू शकेल.

महात्मा गांधीजींनी स्त्रियांना नेहमीच पुरुषांपेक्षाही जास्त महत्त्वाचे मानले आहे. कुटुंबामध्ये स्त्रीचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. कारण बालकावर योग्य संस्कार स्त्री करते. आदर, प्रेम, भावना,सचोटी समरूपकता आणि सामंजस्यमुळे स्त्री स्त्री ही एक शक्ती आहे.स्त्री पुरुष समान असून दोघांचीही भूमिका एकमेकांना पूरक आहे.

एकमेकांविना ते अपूर्ण आहे असे गांधीजी म्हणत. स्त्रियांमध्ये स्वाभिमान, स्वावलंबन शैक्षणिक प्रसाराचे महत्त्व राष्ट्रीय भावना, नेतृत्व ,कर्तृत्व भावना जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य महात्मा गांधीजींनी केले.महात्मा गांधीजी म्हणत मानव म्हणून जे अधिकार पुरुषांना आहे ते सर्व अधिकार स्त्रियांनाही असले पाहिजे. त्यांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असले पाहिजे. आपल्या देशातील स्त्री ही अबला नसून सबला आहे ही जाणीव प्रथम गांधीजींनी करून दिली.

**निष्कर्ष (Conclusion):**

सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांच्या कुटुंबातील सदस्यांना महात्मा गांधीजींचे महिला सबलीकरणाबाबत विचार माहिती असूनही कुटुंबामध्ये निर्णय प्रक्रियेमधे त्यांचे मत विचारात घेतले जात नाही.

सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांना कुटुंबामध्ये स्वातंत्र्य नाही.

सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांना निवृत्तीनंतर आर्थिक निर्णय स्वातंत्र्य नाही.

सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांना कुटुंबामध्ये मानसन्मान दिला जात नाही.

महात्मा गांधीजींनी स्त्री सक्षमीकरणाचे महत्त्व समाजाला सांगितले परंतु आज सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांचा आदर कुटुंबामध्ये राखला जात नाही.

सेवानिवृत्त ज्येष्ठ महिलांच्या नावावर स्थावर संपत्ती नाही.

पती-पत्नी कुटुंबरूपी रथाची दोन चाके असूनही ज्येष्ठ महिलांना पुरुषाच्या बरोबरीने समानता देण्यात येत नाही.

**संदर्भ ( References) :**

* शेळके, रेखा (२०१९): गांधी माणूस ते महात्मा, साकेत प्रकाशन ,औरंगाबाद.
* अजमेरा, सूर्यकांता (२०११): महात्मा गांधीजींची विचारधारा, अथर्व पब्लिकेशन्स धुळे
* देशपांडे, देवयानी (२०१२): गांधी प्रणित अर्थशास्त्राच्या पलीकडे, सेज पब्लिकेशन्स, दिल्ली.
* Singh, Om Prakash (२०१०): Social Vision of Mahatma Gandhi, ABD Publishers, Jaipur.
* पाटील, डी .डी (२०११): महात्मा गांधीजींची युवकांसाठी विचारधारा, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.
* हडप, गोविंद (२०२२): ज्येष्ठांच्या समस्या आणि समुपदेशन, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्यूटर्स, नागपूर.
* तुपे,नवनाथ (२००९): बदलते समाजवास्तव आणि ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न ,अंक ७ वर्ष ३७,योजना मासिक योजना कार्यालय, मुंबई.
* किंजवडेकर, शं.पा. (२०११): महाराष्ट्राचे ज्येष्ठ नागरिक धोरण प्रसिद्ध करायला इतका का विलंब? मनोहारी मनोयुवा, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल, वर्ष ९वे, अंक ११ व १२ नोव्हेंबर डिसेंबर औरंगाबाद.